सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ९१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १६ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## मोदींवरील टीकेवर देवेंद्र फडणवीस संतापले
## म्हणाले, पंतप्रधानांवर अशी टीका करणारे बिनडोक!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६मुंबई** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानभवनात चक्क बुलेटवर एंट्री केल्यानंतर त्यावर जोरदार चर्चा सुरू झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद देत आपण हा मार्ग निवडल्याचं त्यांनी त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर नमूद केलं आहे. सोबत आपल्या बाईक वारीचे फोटोदेखील त्यांनी शेअर केले आहेत. या पार्श्वभूमीवर मोदींचं आवाहन व देवेंद्र फडणवीसांची बुलेट वारी चर्चेत आली असतानाच त्यांनी आपल्या या भूमिकेमागचं कारण स्पष्ट केलं आहे. तसेच, राज्य सरकार पुढचे ६ महिने कोणताही मोठा कार्यक्रम करणार नसल्याचंही देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या बुलेट वारीनंतर जाहीर केलं आहे.

आज विधानभवनात नव्याने निवडून आलेल्या विधानपरिषद सदस्यांचा शपथविधी पार पडला. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुलेटवर विधानभवनात दाखल झाले. त्यांच्यामागे डबलसीट आशीष शेलार बसले होते.




त्यांच्यासोबतचे कर्मचारी व इतर सुरक्षारक्षकदेखील बुलेटवरच विधानभवनात दाखल झाले. त्यांच्या या कृतीची थोड्याच वेळात सर्वत्र चर्चा होऊ लागली. शेवटी फडणवीसांनी नंतर माध्यमांशी बोलताना आपल्या या कृतीमागचं कारण स्पष्ट केलं.

**म्हणून मी बुलेटवर विधानभवनात आलो - देवेंद्र फडणवीस**

पंतप्रधानांनी जे काही निर्देश दिलेत, ते देशहितासाठी आहेत. त्यामुळे आपापल्या परीनं जे काही करता येईल, ते करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. प्रातिनिधिकपणे त्या आवाहनाचा प्रचार व्हायला हवा यासाठी आम्ही हे करतोय.

राज्यातील नेतेमंडळी जेव्हा अशा प्रकारे प्रचार करतात, तेव्हा ते लोकांपर्यंत पोहोचतं. त्यामुळे मी आज इथे बाईकवर आलो आहे. आम्ही सगळ्यांचे ताफे कमी केले आहेत. विदेशवाऱ्या रद्द केल्या आहेत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## 'सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांच्याशी चर्चा करायची इच्छा नाही' - रोहित पवार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६मुंबई** माजी उपमुख्यमंत्री, दिवंगत नेते अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील समीकरणे बदलली आहेत. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या. तर त्यांचा मुलगा पार्थ पवार राज्यसभेचा खासदार झाला. तर दुसरा मुलगा जय पवार राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात सक्रिय झाला आहे. यावरून पक्षात धुसफूस असताना आता पवार कुटुंबातही नाराजी असल्याचे चित्र दिसत आहेत. आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत बोलताना पार्थ पवार आणि सुनेत्रा पवार यांच्याशी बोलायची इच्छा नसल्याचे विधान केले.

अजित पवारांच्या अपघाती निधनानंतर याची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि सत्य बाहेर यावे, यासाठी रोहित पवार आक्रमक झालेले दिसले. त्यांनी



आजवर अनेक पत्रकार परिषदा घेत त्यात सखोल मांडणी केली. तसेच लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह इंडिया आघाडीतील महत्त्वाच्या नेत्यांची भेट घेऊन या प्रकरणात दबाव वाढवण्याचा प्रयत्न केला.

काही दिवसांपूर्वी पार्थ पवार यांच्या कार्यालयाने प्रवासासाठी व्हीएसआर विमान बुक केले होते. तसेच आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या शपथविधीच्या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या बाजूला केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू किंजरापू बसले होते. व्हीएसआर कंपनीच्या मालकाशी त्यांचे संबंध असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला होता. या दोन घटनानंतर आता रोहित पवार यांची ताजी प्रतिक्रिया समोर आली आहे.

अजित पवारांच्या अपघाताच्या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपवावी, अशी मागणी रोहित पवार सातत्याने करत आले आहेत. २८ मे पूर्वी जर अजित पवारांच्या अपघाताचे प्रकरण सीबीआयकडे सुपूर्द केले तर मी स्वतः उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा सत्कार करेन, असे रोहित पवार म्हणाले.

## 'नीट' पेपरफुटी प्रकरणात पुण्यातून महिला प्राध्यापक अटकेत; सीबीआयकडून कारवाई




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६पुणे -** देशभरात गाजत असलेल्या 'नीट' प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणात पुण्यातून जीवशास्त्राच्या प्राध्यापक मनीषा मांढरे हिला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातून अटक केली. मांढरे ही परीक्षा प्रक्रियेशी संबंधित आहे. पेपरफुटी प्रकरणात ती सामील असल्याचे उघडकीस आल्यानंतर तिला अटक करण्यात आली, अशी माहिती सीबीआयने दिली.

'नीट' प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार प्रा. पी. व्ही. कुलकर्णी याला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातून शुक्रवारी अटक केली. कुलकर्णी हा रसायनशास्त्राचा प्राध्यापक आहे. कुलकर्णी हा परीक्षा प्रक्रियेशी संबंधित होता. पेपरफुटी प्रकरणात तो सामील असल्याचे उघडकीस आल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. कुलकर्णीची सीबीआयच्या पथकाने चौकशी केली. चौकशीत मांढरे ही या प्रकरणात सामील असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर तिला शनिवारी सीबीआयने अटक केली.

'नीट' प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणात सीबीआयने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथून धनंजय लोखंडे (वय २६) याला ताब्यात घेतले. लोखंडे हा पुण्यातील काही जणांच्या संपर्कात असल्याची माहिती तपासात मिळाली. त्यानंतर बिबवेवाडी परिसरात ब्यूटी पार्लर चालविणारी मनीषा वाघमारे आणि अभियांत्रिकी शाखेत शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याला पुणे पोलिसांनी बुधवारी (१३ मे) ताब्यात घेतले. धनंजय लोखंडे आणि मनीषा वाघमारे हिला अटक केली. या प्रकरणात जयपूरमधील तीन, गुरुग्राममधील एक आणि नाशिकमधील एका आरोपीचा समावेश आहे.

सीबीआयने देशातील वेगवेगळ्या भागांत छापे टाकले. कागदपत्रे, मोबाइल संच, तसेच अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आली होती. जयपूर, ग्रुरुग्राम, नाशिकि, पुणे, अहिल्यानगर परिसरातून आतापर्यंत नऊ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणातील आरोपींना तपासासाठी दिल्लीत नेले जाणार आहे.

## नितीन गडकरी धमकी प्रकरण: जयेश पुजारीला ५ वर्षांचा कारावास
### अफसर पाशासह दोघांना ४० हजार दंड, नागपूर न्यायालयाचा निकाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६नागपूर-** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपुरातील जनसंपर्क कार्यालयाला धमकी देऊन १०० कोटी रुपयांची खंडणी मागणाऱ्या प्रकरणाचा निकाल नागपूरच्या विशेष न्यायालयाने आज जाहीर केला. या प्रकरणात मुख्य आरोपी जयेश जयेशकांत शाहीर पुजारी आणि अफसर पाशा या दोघांनाही दोषी ठरवत अतिरिक्त सत्र न्यायाधीश अनिलकुमार के. शर्मा यांनी ५ वर्षे सश्रम कारावास आणि प्रत्येकी २० हजार रुपये (एकूण ४० हजार रुपये) दंडाची शिक्षा सुनावली आहे.

हे प्रकरण २०२३ मध्ये समोर आले होते, जेव्हा आरोपींनी कर्नाटकच्या बेळगाव येथील हिंदलगा केंद्रीय कारागृहातून विविध मोबाईल क्रमांकांचा वापर करून नितीन गडकरी यांच्या नागपूरस्थित कार्यालयाच्या लँडलाईनवर धमकीचे कॉल्स केले होते. सुरुवातीला १०० कोटी आणि नंतर १० कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली होती. ही रक्कम न दिल्यास गडकरींना जीवे मारण्याची आणि



कार्यालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती. या तक्रारीनंतर धंतोली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान नागपूर पोलिसांनी तांत्रिक पुराव्यांच्या आधारे वेगाने कारवाई केली. आरोपी जयेश पुजारी याच्याकडे कारागृहात असतानाही सिम कार्ड आणि मोबाईल उपलब्ध असल्याचे निष्पन्न झाले. मोबाईलच्या पडताळणीत 'तालिबान जिंदाबाद', 'टीटीपी' आणि 'अल्लाह अकबर' असे देशविघातक संदेश आढळून आले.

## सायकलवरून बैठकीला पोहोचले आमदार रवी राणा
### इंधन बचतीचा दिला संदेश



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती** बडनेरा मतदार संघाचे अपक्ष आमदार रवि राणा यांनी आज शासकीय विश्रामगृहातून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत सायकल चालवत जाऊन एक वेगळा संदेश दिला. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या खरीप आढावा बैठकीसाठी ते सायकलवरून पोहोचले. रवी राणा यांनी सांगितले की, सध्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे, विशेषतः अमेरिका-इराण संघर्षामुळे तेल पुरवठ्यावर परिणाम होत असून पेट्रोल-डिझेलच्या किंमती वाढत आहेत. अशा परिस्थितीत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाचे पालन करणे आवश्यक आहे.ते म्हणाले की, पंतप्रधानांनी स्वतःच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी केली आहे. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री बावनकुळे यांनीही त्यांच्या ताफ्यात कपात केली आहे. प्रशासनातील अधिकाऱ्यांनी ही आवश्यक तेवढ्याच वाहनांचा वापर करावा, असे त्यांनी सांगितले.मी स्वतः पासून सुरुवात करत सायकलने बैठकीला आलो आहे. यामुळे इंधन बचतीचा संदेश समाजात जावा आणि नागरिकांनीही अशा छोट्या पावलांद्वारे देशहितासाठी योगदान द्यावे, असे आवाहन राणा यांनी केले.

## देवेंद्र फडणवीस ब्राह्मण आहेत म्हणून त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न
### आजच्या राजकारणात अर्थकारणाशिवाय काही चालत नाही- गणेश नाईक

विदर्भ प्रजासत्ताक



**दि.१६मुंबई -** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यात पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापू लागले आहे. मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट निशाणा साधला असतानाच, दुसरीकडे महायुतीचे नेते आणि मंत्री गणेश नाईक यांनी फडणवीसांची जोरदार पाठराखण केली आहे. देवेंद्र फडणवीस हे सर्वसमावेशक भूमिकेचे असतानाही केवळ ते 'ब्राह्मण' असल्यामुळेच त्यांची राजकीय कोंडी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा गंभीर आरोप गणेश नाईक यांनी केला आहे.

## शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी: राज्यात बियाण्यांबाबत तक्रारीसाठी आयुक्तालय स्तरावर नियंत्रण कक्ष, तक्रारी करता येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ मुंबई-** राज्यात कृषी निवीष्ठांबाबत तक्रारीसाठी कृषी आयुक्तालयस्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून या ठिकाणी शेतकऱ्यांना व्हॉटस्अप द्वारे किंवा टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून तक्रार नोंदविता येणार असल्याचे कृषी आयुक्तालयाच्या सुत्रांनी सांगितले.

राज्यात आगामी खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांची तयारी सुरु झाली आहे. सध्या शेतात मशागतीचे काम पूर्ण करण्यात आले असून काही ठिकाणी शेतकऱ्यांकडून खाताची तसेच बियाणांची खरेदी केली जात असल्याचे चित्र आहे. बियाणे व खते भरून ठेवल्यामुळे पेरणी योग्य पाऊस झाल्यानंतर तातडीने पेरणी करता येणे शक्य होणार आहे. त्यादृष्टीने शेतकऱ्यांनी तयारी चालविली आहे.

दरम्यान, आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभुमावर शेतकऱ्यांना बियाणे, खते व किटकनाशके या निविष्ठांचा वेळेत, गुणवत्तापूर्ण व मुबलक प्रमाणात पुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी कृषि विभागामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी कृषि आयुक्तांनी घेतलेल्या आढावा बैठकीत राज्यातील शेतकरी, वितरक व विक्रेत्यांना क्षेत्रीय स्तरावर येणाऱ्या विविध अडचणींचे निवारण करण्यासाठी सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार आयुक्तालय स्तरावर विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून शेतकरी, वितरक व विक्रेत्यांसाठी संपर्कासाठी व्हाट्सअप क्रमांक ९८२२४४६६५५ उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच कृषि विभागाचा टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० यावर देखील संपर्क साधता येणार आहे.यासोबतच बियाणे, खते व किटकनाशकांच्या गुणवत्ता, किंमत, साठेबाजी, लिकींग किंवा इतर संबंधित अडचणी व तक्रारी नोंदवता येतील. तक्रार नोंदविताना संबंधितांनी आपले नाव, संपूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक तसेच अडचण किंवा तक्रारीचा संक्षिप्त तपशील नमूद करावा.



## संपादकीय ......

# मान्सूनचे शुभवर्तमान

*तापमानाचा पारा अर्धशतक झळकावण्याच्या दिशेने चाललेला असताना, उष्णतेच्या लाटांनी सर्वदूर होरपळ होत असताना भारतीय हवामान खात्याने दिलेली मान्सूनच्या आगमनाची सुवार्ता दिलासादायक आहे. यंदा मान्सूनचे आगमन वेळेपूर्वी होण्याची दाट शक्यता आहे. मान्सूनच्या प्रवासासाठी सध्या अत्यंत पोषक स्थिती तयार झाली असून, १६ मे च्या सुमारास बंगालचा उपसागर, अंदमान समुद्र आणि अंदमान-निकोबार बेटांवर मान्सूनचे आगमन होऊ शकते, असे हवामान खात्याचे म्हणणे आहे. मान्सूनच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेले समुद्रावरील वार्यांची दिशा, आर्द्रता आणि वातावरणीय दाबाचे घटक सध्या अनुकूल आहेत. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्यामुळे मान्सूनची पावले वेगाने भारताच्या दिशेने पडू लागली आहेत. मान्सूनचा हा प्रवास असाच अखंड सुरू राहिल्यास केरळ आणि महाराष्ट्रातही पाऊस वेळेपूर्वी धडकू शकतो. मान्सूनचे आगमन नेमके झाले आहे का, मान्सूनपूर्व पाऊस आहे की अवकाळी ही चर्चा दरवर्षी रंगते. हवामान खात्याच्या संकेतांनुसार मान्सूनच्या अधिकृत आगमनासाठी केवळ पाऊस पुरेसा नसून तीन अटी पूर्ण होणे आवश्यक असते. एक म्हणजे केरळमधील १४ ठरावीक हवामान केंद्रांपैकी किमान ६० टक्के केंद्रांवर सलग दोन दिवस २.५ मिलिमीटर किंवा त्यापेक्षा जास्त पावसाची नोंद होणे. दुसरी म्हणजे वातावरणातील वार्याचा वेग ठरावीक उंचीवर ठरावीक मर्यादेपेक्षा जास्त असणे आणि तिसरी म्हणजे उपग्रहाद्वारे मोजल्या जाणार्या उष्णतेच्या लहरींचे प्रमाण विशिष्ट मर्यादेच्या खाली असणे. या तिन्ही गोष्टींची पूर्तता झाल्यावरच मान्सून केरळमध्ये दाखल झाल्याचे जाहीर केले जाते. मान्सूनच्या आगमनाच्या तारखेत दरवर्षी तफावत आढळते. तरीही साधारणपणे एक जूनला मान्सून केरळमध्ये दाखल होतो. गतवर्षी मात्र तो २४ मे रोजी तर २०२४ मध्ये ३० मे रोजी पोहोचला होता. गेल्या पाच वर्षांत मे महिन्याच्या मध्यानंतर दक्षिण भारतात आणि बंगालच्या उपसागरात मान्सूनपूर्व हालचालींना वेग आल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. भारतातील एकूण पावसाच्या ७० टक्क्यांहून अधिक पाऊस जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत पडतो. मान्सूनचे लवकर किंवा उशिरा येणे याचा परिणाम विविध क्षेत्रांवर होतो. खरीप हंगामातील पेरण्यांचे संपूर्ण नियोजन मान्सूनच्या आगमनावर अवलंबून असते. मान्सून वेळेवर आला, तर जमिनीतील ओलावा पेरणीसाठी अनुकूल बनतो. यामुळे उत्पादनात वाढ होते. याउलट मान्सून लांबणीवर पडल्यास पिकांचे चक्र विस्कळीत होते आणि त्याचा फटका अन्नधान्य उत्पादनाला बसतो. प्रमुख धरणे आणि नद्यांमधील पाणीसाठा मान्सूनवरच अवलंबून असतो. मान्सूनचे आगमन वेळेवर झाल्यास जलविद्युत प्रकल्पांची कार्यक्षमता टिकून राहते आणि उन्हाळ्यातील पाणीटंचाईचा ताण कमी होण्यास मदत होते. मान्सूनच्या अनिश्चिततेमुळे शेती उत्पादनात घट झाल्यास अन्नधान्याचे भाव वाढून त्याचा फटका सर्वसामान्यांना आणि विकास दराला बसतो. अरबी समुद्र, बंगालच्या उपसागरातील पृष्ठभागाचे वाढते तापमान मान्सूनच्या आगमनावर परिणाम करत आहे. हवामान बदलामुळे मान्सून आगमनाची तारीख आणि पावसाचे वितरण यात मोठी अनिश्चितता निर्माण झालीय. आगमनाइतकेच मान्सूनचे वितरणही महत्त्वाचे आहे. वेळेवर दाखल होऊन नंतर खंड पडल्यास शेतकर्यांवर दुबार पेरणीचे संकट येते. गेल्या काही वर्षांत कमी कालावधीत जास्त पाऊस पडण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. पूर्वी पावसाळ्यात १०० दिवस पाऊस पडायचा. आता एखाद्या वर्षी तो ८० तास पडतो, तर एखाद्या वर्षी अतिवृष्टी होऊन ओल्या दुष्काळाचे संकट निर्माण होते. यंदा अल निनो सक्रिय झाल्यामुळे मान्सून सरासरीपेक्षा कमी बरसण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. शेतकरी, सामान्य जनता आणि शासन-प्रशासन सारेजण त्यामुळे काहीसे चिंतेत आहेत. मे महिन्याच्या उत्तरार्धातील स्थिती महत्त्वाची आहे. अरबी समुद्र किंवा बंगालच्या उपसागरात या काळात निर्माण होणारी चक्रीवादळे मान्सूनच्या वाटचालीवर परिणाम करतात. हे चक्रीवादळ ओमान किंवा पाकिस्तानच्या दिशेने सरकले, तर ते मान्सूनसाठी आवश्यक असलेली आर्द्रता सोबत घेऊन जाते. यामुळे मान्सूनचे वारे कमकुवत होतात आणि केरळमध्ये पावसाचे आगमन लांबणीवर पडते. यंदा अशी शक्यता दिसत नाही, हीदेखील आनंदाची बाब आहे.अल निनो सक्रिय असतानाच्या काही वर्षांमध्ये भारतीय उपखंडात पर्जन्यमान चांगले राहिल्याची उदाहरणे इतिहासात आढळतात. १९५१ ते २०२३ या कालावधीतील सुमारे १५ अल निनो वर्षांपैकी साधारण ६ वर्षांमध्ये भारतात सामान्य किंवा सामान्यपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली. यामागे 'इंडियन ओशन डायपोल' हा घटक अत्यंत प्रभावी ठरतो. हिंदी महासागराचा पश्चिम भाग पूर्वेकडील भागापेक्षा जास्त उबदार असतो, तेव्हा त्याला 'पॉझिटिव्ह आयओडी' म्हटले जाते. हा घटक प्रशांत महासागरातील अल निनोच्या नकारात्मक प्रभावाला निष्प्रभ करतो. १९९७ मध्ये शतकातील सर्वात शक्तिशाली अल निनो सक्रिय असूनही भारताने सामान्यपेक्षा जास्त म्हणजे १०२ टक्के पाऊस अनुभवला होता. त्यामुळे अल निनो, भीषण दुष्काळ असे म्हणत भुई थोपटण्यापूर्वी मान्सूनला अनुकूल अन्य घटकांमधील बदलांकडे लक्ष ठेवणे आवश्यक ठरते. पाऊस किती पडतो यापेक्षाही आपण तो साठवतो किती, जमिनीमध्ये किती जिरवतो हे अधिक महत्त्वाचे आहे. आजवर आलेल्या दुष्काळांनी प्रचंड मोठे नुकसान सोसावे लागले. तरीही जल संवर्धन, पाणीवापर याबाबत समाजात पुरेशी जागरुकता नाही. जलयुक्त शिवार योजनेतून राज्यातील किती तरी गावांची पाणीटंचाई दूर होऊन तेथील भूजलपातळी उंचावली. नाला खोलीकरण, रुंदीकरण, सिमेंट साखळी बंधारे यांचा समावेश असणारा हा उपक्रम महाराष्ट्राला पाणीदार करणारा आहे. या मोहिमेमुळे राज्यात सुमारे २५ लाख टीसीएमहून अधिक पाणी साठवण क्षमता निर्माण झाली. यंदा मान्सून काळात जास्तीत जास्त जलसंवर्धन झाल्यास पावसात पडणार्या खंडामुळे निर्माण होणारा ताण जाणवणार नाही. जागतिक संकटामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना करताना इंधनाचा काटकसरीने वापर करण्याबाबत समाज जागृत होत आहे. तीच जागरुकता पाणीवापराबाबतही दिसायला हवी. कारण जीवाश्म इंधनाला पर्याय आहेत; पाण्याला नाही!*

# अमरावती जिल्ह्यात 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर

## २५.८१ लक्ष मतदारांच्या नोंदींची होणार घरोघरी जाऊन प्रत्यक्ष पडताळणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती,**

भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष सखोल पुनरिक्षण' (डखठ) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला असून, यामध्ये अमरावती जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. या व्यापक मोहिमेअंतर्गत अमरावती जिल्ह्यातील सुमारे २५ लक्ष ८१ हजार ७२२ मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामाशी सांगड घालून क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून या तिसर्‍या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून, जिल्ह्यातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबर २०२६ मध्ये पूर्ण होणार आहे. या मोहिमेची अंमलबजावणी अत्यंत व्यापक स्वरूपात केली जाणार असून, मतदान केंद्रस्तरीय अधिकार्‍यांमार्फत प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन तपशिलाची खातरजमा केली जाईल. या प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले 'बूथ लेव्हल एजंट्स' (इङ-) त्यांना सहकार्य करणार आहेत. जिल्ह्यात आजपर्यंत झालेल्या मतदार मॅपिंगच्या सद्यस्थितीचा विचार करता, ३६-धामणगाव रेल्वे मतदारसंघात ३ लक्ष १३ हजार ४२५ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ९१ हजार ७८४ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून २१ हजार ६४१ मतदारांचे मॅपिंग अपूर्ण आहे, ज्याची टक्केवारी ९३.१ इतकी आहे. ३७-बडनेरा मतदारसंघात ३ लक्ष ७८ हजार २९२ एकूण मतदारांपैकी ३ लक्ष १ हजार ५१७ मतदारांचे मॅपिंग पूर्ण व ७६ हजार ७७५ अपूर्ण असून टक्केवारी ७९.७ आहे. ३८-अमरावती मतदारसंघात ३ लक्ष ८३ हजार ४७१ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ८२ हजार ४३७ मतदारांचे मॅपिंग पूर्ण व १ लक्ष १ हजार ३४ अपूर्ण असून टक्केवारी ७३.६५ आहे. ३९-तिवसा मतदारसंघात २ लक्ष ९९ हजार १४ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ६२ हजार २९ मतदारांचे मॅपिंग पूर्ण व ३६ हजार ९८५ अपूर्ण असून टक्केवारी ८७.६३ आहे. ४०-दर्यापूर मतदारसंघात ३ लक्ष ७ हजार ८५१ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ९० हजार ३७२ मतदारांचे मॅपिंग पूर्ण व १७ हजार ४७९ अपूर्ण असून टक्केवारी ९४.३२ आहे. ४१-मेळघाट मतदारसंघात ३ लक्ष ११ हजार ४७८ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ७४ हजार ५८१ मतदारांचे मॅपिंग पूर्ण व ३६ हजार ८९७ अपूर्ण असून टक्केवारी ८८.१५ आहे. ४२-अचलपूर मतदारसंघात २ लक्ष ९५ हजार ८३६ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ४८ हजार २१८ मतदारांचे मॅपिंग पूर्ण व ४७ हजार ६१८ अपूर्ण असून टक्केवारी ८३.९ आहे. तर ४३-मोर्शी मतदारसंघात २ लक्ष ९२ हजार ३५५ एकूण मतदारांपैकी २ लक्ष ६० हजार ३७५ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून ३१ हजार ९८० मतदारांचे मॅपिंग अपूर्ण आहे आणि येथील टक्केवारी ८९.०६ आहे.

अशाप्रकारे संपूर्ण जिल्ह्यात एकूण २५ लक्ष ८१ हजार ७२२ मतदारांपैकी २२ लक्ष ११ हजार ३१३ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून ३ लक्ष ७० हजार ४०९ मतदारांचे मॅपिंग अपूर्ण आहे, ज्याची एकूण सरासरी टक्केवारी ८५.६५ इतकी आहे. या मोहिमेसाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर निवडणूक यंत्रणा व मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे. मतदारसंघनिहाय आढावा घेतला असता, ३६-धामणगाव रेल्वे मतदारसंघात ३७८ एकूण मतदान केंद्रे, ३८ पर्यवेक्षक आणि ३७८ बीएलओ कार्यरत आहेत. ३७-बडनेरा मतदारसंघात ३४५ मतदान केंद्रे, २९ पर्यवेक्षक आणि ३४५ बीएलओ आहेत. ३८-अमरावती मतदारसंघात ३२२ मतदान केंद्रे, ३१ पर्यवेक्षक आणि ३२२ बीएलओ आहेत. ३९-तिवसा मतदारसंघात ३१९ मतदान केंद्रे, ३३ पर्यवेक्षक आणि ३१९ बीएलओ आहेत. ४०-दर्यापूर मतदारसंघात ३४२ मतदान केंद्रे, २० पर्यवेक्षक आणि ३४२ बीएलओ आहेत. ४१-मेळघाट मतदारसंघात ३५६ मतदान केंद्रे, २३ पर्यवेक्षक आणि ३५६ बीएलओ आहेत. ४२-अचलपूर मतदारसंघात ३०९ मतदान केंद्रे, २५ पर्यवेक्षक आणि ३०९ बीएलओ आहेत. तर ४३-मोर्शी मतदारसंघात ३११ मतदान केंद्रे, २६ पर्यवेक्षक आणि ३११ बीएलओ कार्यरत आहेत. संपूर्ण अमरावती जिल्ह्याचा विचार करता एकूण २ हजार ६८२ मतदान केंद्रे, २२५ पर्यवेक्षकांची पदे आणि २ हजार ६८२ बीएलओ या प्रक्रियेसाठी सज्ज करण्यात आले आहेत. जिल्हा प्रशासनाने या मोहिमेचे वेळापत्रक प्रसिद्ध केले असून, त्यानुसार दिनांक २० ते २९ जून २०२६ या कालावधीत सर्व बीएलओ यांना प्रशिक्षण आणि पूर्वतयारी करून दिली जाईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत निवडणूक यंत्रणा प्रत्यक्ष घरोघरी जाऊन मतदारांच्या भेटी घेईल. या पडताळणीनंतर ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. नागरिकांना ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आपल्या दावे व हरकती नोंदवता येतील. सर्व दावे व हरकतींचा निपटारा केल्यानंतर शेवटी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

माहितीची अचूकता आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आशिष येरेकर यांनी सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले अधिकृत एजंट (इङ-) नियुक्त करण्याचे जाहीर आवाहन केले आहे. यामुळे मतदार यादीतून दुबार नावे तसेच मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि अचूक होण्यास मदत होणार आहे, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी कळविले आहे

# रेल्वे वेटींग रुममधून मोबाईल चोरी करणाऱ्यास अटक, ५ हॅन्डसेट जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

रेल्वेस्थानकावरील वेटींग रुममधून प्रवाशांचे मोबाईल चोरीकरणाऱ्यास रेल्वे गुन्हेशाखा व आरपीएफच्या मदतीने एकास अटक केली असून, त्याच्याकडून चोरीचे पाच हॅन्डसेट जप्त केले आहे. शेख जावेद उर्फ दत्तू शेख शब्बीर (वय ३२, रा. लालखडी, अमरावती) असे अटक संशयिताचे नाव असल्याची माहिती रेल्वेच्या पोलिस निरीक्षक अर्चना गावडे यांनी दिली. दोन दिवसांपूर्वी बडनेरा रेल्वेस्थानकाचे वेटिंग रुमच्या हॉलमधुन मोबाईल चोरीचा गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांनी यावेळी



सीसीटीव्ही फुटेज तपासणी केले असता, त्यात संशयित शेख जावेद उर्फ दत्तू हा सहभागी असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांच्या हाती लागली. त्याआधारे संशयितास अटक करण्यात आली. संशयिताकडून दाखल असलेल्या गुन्ह्यातील दोन मोबाईलसह अन्य तीन असे एकूण पाच मोबाईल हॅन्डसेट जप्त करण्यात आले. जप्त मोबाईल ५६ हजारांचे आहेत. संशयितास न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावल्याने त्याची रवानगी मध्यवर्ती कारागृहात करण्यात आली. जीआरपीच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक अर्चना गाडवे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे राहुल हिरोडे, शरद जुनघरे, राजू गाढवे, प्रदीप घोडकर, शरद कवळकर, सागर पेटे, लोहमार्ग नागपूरचे सागर खंडारे, आरपीएफचे सागर पकडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# भावाने किडनी देऊन वाचविले भावाचे प्राण

## सुपर स्पेशलिटी रुग्णालयात किडनी प्रत्यारोपण यशस्वी

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१६अमरावती**

स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात लहान भावाने आपल्या मोठ्या भावाचे प्राण वाचविण्यासाठी स्वतःची किडनी दिल्याची घटना घडली. या रुग्णालयात ही ७१ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

संबंधित रुग्ण हा काही महिन्यांपासून किडनी आजाराने त्रस्त असल्याने त्यासाठी बाहेर उपचार सुरु होते. डॉक्टरांनी रुग्णास व त्याच्या कुटुंबीयास किडनी प्रत्यारोपण विषयी माहिती दिली व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून होत असलेल्या यशस्वी व विनामूल्य



शस्त्रक्रियेची माहिती दिली. भावाच्या पुढील भविष्याचा विचार करून लहान भाऊ शेख शहबाज अहमद अब्दुल एजाज ( वय ३७) यांनी आपली एक किडनी मोठा भाऊ इर्शादला देण्याचा निर्णय घेतला व त्याला नवीन जीवन दिले. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली. सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ. हितेश गुल्हाने, युरो सर्जन डॉ. राहुल पोटोडे, डॉ. विक्रम देशमुख, डॉ. प्रतिक चिरडे, डॉ. राहूल घुले, बधिरिकरण तज्ञ डॉ. रोहित हातगावकर, डॉ. बालकृष्ण बागवाले, डॉ. दिपाली देशमुख, डॉ. अश्विनी मढावी, डॉ. रमणिका ढोमणे, डॉ. शीतल सुसटकर, डॉ. विक्रांत कुळमेथे, डॉ. माधव ढोपरे, डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ. नाहीद, डॉ. रमणीय, डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव, समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ. सोनाली चौधरी आदींनी त्यासाठी परिश्रम घेतले.

# महिलांनो, आत्मरक्षणासाठी दुर्गा बना!

## काजल हिंदुस्थानी यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६दर्यापूर** महिलांवर होणार्या अत्याचाराला आळा बसवायचा असेल तर आत्मरक्षणासाठी दुर्गा बनावे लागेल. आपल्या मुलांवर चांगले संस्कार करा, मोबाईलच्या अति वापरापासून दूर रहा, अनोळखी व्यक्तीला मोबाईलवर मित्र बनवू नका, असे आवाहन सुप्रसिद्ध वक्त्या काजल हिंदुस्थानी यांनी दर्यापूरमधील भरगच्च सभेत केले. सकल हिंदू समाज व गोपाल अरबट मित्र परिवाराच्या वतीने या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून मोर्शीच्या नगराध्यक्षा प्रतीक्षा गुल्हाने, प्रमुख पाहुणे अंजनगावचे नगराध्यक्ष अविनाश गायगोले तर प्रमुख उपस्थितीमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील डिके, सहसंपर्क प्रमुख गजानन वाकोडे, मार्गदर्शक रवींद्र गणोरकर, महिला आघाडी जिल्हाप्रमुख अरुणा इंगोले, जयश्री कातकिडे, वंदना दारव्हेकर, मदत कक्षाच्या सोनाली देशमुख, तालुका प्रमुख छाया निचळ, मीनाक्षी कपले, डॉ. भावना भुतडा, भारतीय जनता पार्टीच्या मेघा भारती,



प्रगती पोटे, वर्षा उफाळे, विद्या अरबट, अपर्णा मालठाने, प्रा. प्रणिता बिजवे, वृंदा मुक्तेवार, भाग्यश्री सगणे, प्रीती उमाळे, डॉ. दिनेश म्हाला यांचा समावेश होता.शहरातील बस स्थानक चौकात असलेल्या कन्या शाळेच्या मैदानात आयोजि या कार्यक्रमात काजल हिंदुस्थानी यांना ऐकण्यासाठी मोठी गर्दी जमली होती. विशेषतः महिला मोठ्या प्रमाणात एकत्र आल्या होत्या. यावेळी दर्यापूर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. आपल्या प्रखर वाणीतून काजल हिंदुस्थानी यांनी लव्व जिहाद, लँड जिहादचे भीषण वास्तव लोकांसमोर मांडले. यासाठी देव, देश, धर्म याबाब चे संस्कार आपल्या मुलांवर करण्याचे आवाहन करीत महिलांनी आत्मरक्षणासाठी दुर्गा बनण्याचे सुद्धा आवाहन काजल हिंदस्थानी यांनी केले. शिवसेना नेते गोपाल अरबट यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महेंद्र भांडे, तुषार चौधरी, राहूल भुंबर, नागोराव केने, प्रा. विनोद बिजवे, नीलेश टवलारकर, विलास साखरे, नंदू निकोले, हेमंत उमाळे, सागर गेठे, तुषार चौधरी, नीरज नागे, मुन्ना इसोकार, नगरसेवक स्वप्निल गावंडे, रोशन कट्यारमल, नगरसेवक गणेश धुराटे, कपिल पोटे आदींनी परिश्रम घेतले.

# १४ शेतकऱ्यांची चार लाखांनी फसवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती-** शेतकऱ्यांना एचपीचे सोलर योजना मिळवून देतो, असे आमीष दाखवून नांदगावखंडेश्वर तालुक्यातील १४ शेतकऱ्यांची तब्बल ४ लाख ७०२ रुपयांनी फसवणूक केली आहे. नांदगावखंडेश्वर पोलिसांनी याप्रकरणी सूरज सुभाषराव आडकिने (रा. टोंगलाबाद, नांदगावखंडेश्वर) यांच्या तक्रारीवरून संशयित सुनील विश्वेश्वर टाके (रा. मलकापूर, जि. बुलडाणा) याच्याविरुद्ध शेतकऱ्यांची फसवणूक व विश्वासघात प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्री. आडकिने यांचे नांदगावखंडेश्वर बसस्थानक परिसरात झेरॉक्स ॲण्ड ऑनलाइन सेंटर आहे. ते शासनातर्फे निघालेल्या योजनेबाबत नागरिकांचे ऑनलाइन फॉर्म भरुन देतात. शासनाची मागेल त्याला सोलर या योजनेचा लाभ मिळविण्याकरीता बऱ्याच शेतकऱ्यांनी सोलरवर चालणारी मोटरपंप मिळण्याकरीता सूरज आडकिने यांच्या ऑनलाइन सेंटरवरुन अर्ज भरले होते. या योजनेतून शेतकऱ्यांना सोलर मोटार पंपच्या एकूण रकमेपैकी १० टक्के रक्कम भरायची होती. ती रक्कम अनुसुचित जाती व जमाती करिता ५ टक्के भरावयाची होती. उर्वरित ९० टक्के किंवा ९५ टक्के शासनामार्फत सबसिडीद्वारे भरली जात होती. सुनील टाके हा व्यक्ती सूरज आडकिने यांच्या ओळखीचा होता. तो आडकिने यांच्या झेरॉक्स सेंटरवर येऊन गावातील शेतकऱ्यांना जास्त एचपीचे सोलर मिळवून देतो असे सांगून शेतकऱ्यांकडून रोख व फोनपे द्वारे पैसे घेत होता. सोलर योजना मंजूर करून देतो असे सांगून सूरज आडकिने व इतर शेतकऱ्यांकडून ४ लाख ७०२ रुपये संशयित सुनील टाके याने घेतले. कोणताही लाभ शेतकऱ्यांना मिळाला नाही. शेतकऱ्यांची संशयित सुनील विश्वेश्वर टाके याने फसवणूक केली, असा आरोप सूरज आडकिने यांनी तक्रारीत केल्यावर नांदगावखंडेश्वर पोलिसांनी फसवणूकीचा गुन्हा दाखल केला आहे.

> सुनील टाके सारख्या व्यक्तीने केलेल्या कोणत्याही फसव्या आवाहनाला शेतकऱ्यांनी बळी पडू नये. संबंधित व्यक्तीने ज्यांची ज्यांची फसवणूक केली त्यांनी पोलिसांशी संपर्क साधावा.
> – **किरण वानखडे,** पोलिस निरीक्षक, स्थानिक गुन्हेशाखा,

# मनपा प्रशासकीय इमारतीसाठी जागा मागणार

## पालमकंत्र्यांकडे मनपा आयुक्त करणार मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती** – महापालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत व टाऊन हॉलच्या पुनर्निमाणाचा प्रस्ताव पालकमंत्र्यांना देण्यात येणार आहे. इमारतीसाठी मोसीकॅल येथील पाच एकर व नविन तहसील कार्यालयालगतच्या जागेची मागणी या प्रस्तावातून करण्यात आली आहे. यापैकी जी जागा आधी मिळेल तेथे प्रशासकीय इमारत उभारण्याची महापालिकेची योजना आहे. विद्यमान स्थितीत असलेली महापालिकेची राजकमल चौक येथील प्रशासकीय इमारत शिकस्त होण्यासोबतच अपुरी पडू लागली आहे. नविन प्रशासकीय इमारतीत विद्यमान कार्यालयांसोबतच झोन कार्यालय सुद्धा आणण्याची योजना आहे. त्यासाठी प्रशस्त जागेची आवश्यकता असल्याने नविन जागेचा शोध महापालिका प्रशासनाने सुरू केला आहे. मोसीकॅलची विलासनगर येथे २३ एकर जागा असून त्यापैकी पाच एकर जागेची मागणी करणारा प्रस्ताव मनपा प्रशासनाने पालमकंत्र्यांकडे दिला आहे. यासोबतच नविन तहसील कार्यालयानजिक दीड एकर जागा असून त्या जागेचाही प्रस्ताव दिला आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# जनतेला पाणी नाही तर अधिकाऱ्यांना खुर्ची नाही

## ५ दिवसांत सुधारणा न झाल्यास अधिकाऱ्यांना गल्लीगल्लीत फिरविण्याचा इशारा

### पाणीटंचाईवर आमदार रवी राणा आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती :**

जिल्ह्यातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर अध्यक्ष विधानसभा आश्वासन समिती तथा आमदार रवी राणा यांनी मालटेकडी येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत प्रशासनावर जोरदार टीका करत निष्काळजी अधिकाऱ्यांना कठोर इशारा दिला. जनतेला पाणी नाही तर अधिकाऱ्यांना खुर्ची नाही, असा थेट इशारा देत येत्या पाच दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते व कार्यकारी अभियंत्यांना स्वत:सोबत गल्लीगल्लीत फिरवून नागरिकांच्या समस्या दाखविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.बैठकीत अमरावती शहरासह भातकुली, चिखलदरा, अचलपूर, चांदूरबाजार, दर्यापूर, धरणी, अंजनगाव सुर्जी आदी भागांतील पाणीपुरवठ्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अनेक गावांमध्ये चार ते पाच दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असल्याचे निदर्शनास आले. काही ठिकाणी मोठ्या पाण्याच्या



टाक्या पूर्ण क्षमतेने भरल्या जात नसल्यामुळे पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याबद्दल राणा यांनी संताप व्यक्त केला.तत्कालीन खासदार नवनीत राणा यांच्या पुढाकारातून मंजूर झालेल्या ९५० कोटी रुपयांच्या अमृत योजनेचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. या योजनेत १५ मोठ्या पाण्याच्या टाक्यांचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या योजनांवरही चर्चा झाली.यावेळी अधिकाऱ्यांना ग्रामीण भागात प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. नागरिकांचे फोन तत्काळ उचलून त्यांच्या समस्या सोडविण्याचे आदेशही देण्यात आले. बैठकीत उपमहापौर, नगरसेवक, सरपंच, विविध विभागांचे अधिकारी तसेच युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष सोनाली नवले यांनी नेरपिंगळाई गावासाठी दोन तासांच्या पाणीपुरवठ्याचा वेळ वाढवून घेण्यात यश मिळविले.

# मॉन्सूनचे अंदमानात आगमन

## महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीवर ६ जून पर्यंत पोहचणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६मुंबई–** नैऋत्य मोसमी वाऱ्यांच्या आगमनाला वेग आला असून मॉन्सूनने आज (१६ मे) अंदमान-निकोबार बेटांमध्ये प्रवेश केला आहे. अंदमान समुद्र, दक्षिण बंगालचा उपसागर आणि विषुववृत्तीय हिंदी महासागरात अनुकूल वातावरण निर्माण झाल्याने यंदा मॉन्सूनचा प्रवास वेळेआधी सुरू झाला आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा मॉन्सून केरळमध्ये साधारण २६ मे रोजी दाखल होण्याची



शक्यता असून, त्यानंतर तो नियोजित वेळेत देशभर पुढे सरकेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.एल-निनोच्या प्रभावामुळे यंदाच्या पावसाबाबत संमिश्र चर्चा सुरू असतानाच मॉन्सूनच्या लवकर आगमनाने दिलासा मिळाला आहे. साधारणतः मॉन्सून १ जूनपर्यंत केरळमध्ये पोहोचतो. मात्र, यंदा तो सहा दिवस आधी दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. गतवर्षी मॉन्सून २४ मे रोजी केरळमध्ये दाखल झाला होता.

भारतीय हवामानशास्त्र विभागाने जून ते सप्टेंबर या कालावधीत देशात सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. या अंदाजात पाच टक्के कमी-अधिक पावसाची शक्यताही गृहीत धरली आहे. हवामान विभागाच्या मते, यंदा मॉन्सूनच्या मार्गात कोणतेही मोठे चक्रीवादळ अडथळा ठरण्याची शक्यता नसल्याने त्याचा प्रवास विनाअडथळा होण्याची चिन्हे आहेत. अंदमानात वेळेपूर्वी दाखल झाल्यानंतर मॉन्सून केरळच्या दिशेने पुढे सरकेल. केरळमध्ये ३१ मेच्या सुमारास पावसाचे आगमन अपेक्षित असून, त्यानंतर ६ जूनपर्यंत तो कोकण किनारपट्टीवर पोहोचण्याची शक्यता आहे.

# उत्कृष्ट आरोग्यसेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा मनपात सत्कार

## डेंगू रोगाला हरविण्यासाठी प्रतिबंधक उपाय करा : महापौर श्रीचंद तेजवानी यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती,**

जागतिक डेंगू दिनानिमित्त १६ मे रोजी अमरावती महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात उत्कृष्ट आरोग्यसेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. डेंगू, मलेरिया, चिकनगुनिया, हत्तीरोग तसेच इतर कीटकजन्य रोगांच्या प्रतिबंधासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉक्टर, नर्स, एमपीडब्ल्यू, आशा वर्कर व इतर कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र व मोमेंटो देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाला महापौर श्रीचंद तेजवानी, मनपा आयुक्त वर्षा लड्डा, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. शरद जोगी, सहाय्यक संचालक डॉ. रफिक अन्सारी, साथ रोग नियंत्रण अधिकारी डॉ. रुपेश खडसे, डॉ. संदीप पाटबागे, डॉ. स्वाती कोवे



आदी मान्यवर उपस्थित होते.महापौर श्रीचंद तेजवानी यांनी नागरिकांनी डेंगूविरोधी प्राथमिक प्रतिबंधक उपाय करावेत, असे आवाहन केले. स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी स्वच्छतेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली. विरोधी पक्षनेते विलास इंगोले यांनी आरोग्य विभागाच्या कार्याचे कौतुक करत, मागील दोन वर्षांच्या तुलनेत यंदा डेंगू संशयित रुग्णांची संख्या केवळ ८६ वर आल्याचे नमूद केले.मनपा आयुक्त वर्षा लड्डा यांनी आरोग्य विभागाला औषधे व साहित्याची कोणतीही कमतरता भासू देणार नसल्याचे सांगत डेंगूमुक्त अमरावती करण्याचा निर्धार व्यक्त केला. डॉ. विशाल काळे यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांनी नागरिकांमध्ये जाऊन सर्वेक्षण व जनजागृती अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या.कार्यक्रमाचे आयोजन आरोग्य निरीक्षक हैदर अली व शशिकांत जयस्वाल यांनी केले. सूत्रसंचालन दीपांकर बरडे व बबन खंडारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. रुपेश खडसे यांनी मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने आरोग्य कर्मचारी व वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

### अवैध वाळू वाहतुकीवर मोठी कारवाई

# पोलिसांकडून ५६ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६धा.रेल्वे**

अमरावती ग्रामीण पोलिसांनी अवैध वाळू वाहतुकीविरोधात धडक मोहीम सुरू ठेवत तळेगाव दशासर पोलिसांनी पहाटेच्या सुमारास मोठी कारवाई केली. या कारवाईत ५५ लाख रुपये किमतीचा ट्रक आणि एक लाख ४० हजार रुपये किमतीची १४ ब्रास कन्हान रेती असा एकूण ५६ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत शुक्रवारी (ता.१५) पहाटे साडेतीन वाजताच्या सुमारास तळेगाव दशासर पोलिस स्टेशनचे पथक हद्दीत गस्त घालत होते. दरम्यान, समृद्धी महामार्ग परिसरातून अवैध रेती वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचासमक्ष कारवाई करत एम.एच.२७ डी.झेड. २११४ क्रमांकाचा ट्रक ताब्यात घेतला. ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये विनारॉयल्टी १४ ब्रास कन्हान रेती आढळून आली. त्यानंतर पोलिसांनी ट्रकसह रेती जप्त केली. या प्रकरणी हेड कॉन्स्टेबल अमर काळे यांच्या फिर्यादीवरून चालक शरीफ बुद्धू लुचईवाले तसेच ट्रक मालक ख्वाजा सलमान अब्दुल रहमान यांच्या विरोधात तळेगाव दशासर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल पवार, पोलिस निरीक्षक किरण वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली तळेगाव दशासरचे ठाणेदार किरण औटे, हेड कॉन्स्टेबल पवन अलोने, कॉन्स्टेबल अमर काळे, पंकज शेडे आणि गौतम गवळे यांनी पार पाडली.

# अल्पवयीन पीडितेचा दोघांशी विवाह

## पहिल्या व दुसऱ्या पतीविरुद्ध अत्याचाराचा गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६दर्यापूर–** अल्पवयीन मुलीचे दीड वर्षांमध्ये दोघांसोबत लग्न लावून देण्यात आल्याची धक्कादायक घटना जिल्ह्यात उजेडात आली. दोघांनी तिला हाकलून दिल्यामुळे पीडितेवर बेघर होण्याची वेळ आली. त्यामुळे त्या दोघांविरुद्ध दर्यापूर पोलिसांनी अत्याचारासह बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हे दाखल केले आहेत. १६ वर्षीय पीडित अल्पवयीन मुलीचे लग्न २०२४ मध्ये दर्यापूर तालुक्यातील एका ३१ वर्षीय व्यक्तीसोबत काही नातेवाइकांनीच गळ्यात हार टाकून लावून दिले होते. ज्याच्यासोबत लग्न लावले त्या व्यक्तीचे पीडित अल्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध प्रस्थापीत केले. त्यानंतर काही दिवसांनी पिडीता कौटुंबिक वादामुळे नातेवाइकांकडे परत निघून गेली होती. त्यानंतर चार महिन्यांपूर्वी २०२६ मध्ये अल्पवयीन मुलीचे दुसरे लग्न काही जणांनी मध्यस्थी करून अकोला जिल्ह्यातील अन्य युवकासोबत पीडितेच्या मनाविरुद्ध लावून दिले होते. लग्न लावताना दुसऱ्या पतीचे आईवडील व काही नातेवाईक हजर होते. दुसऱ्या पतीनेही पीडित अल्पवयीन मुलीसोबत शारीरिक संबंध प्रस्थापीत केले. मात्र, त्याच्याकडून सुद्धा त्रास देणे सुरू झाल्यामुळे पीडित अल्पवयीन मुलगी पहिले लग्न ज्या व्यक्तीसोबत झाले त्याच्याघरी परत गेली. परंतु त्याने हाकलून दिले. दरम्यान, पीडित मुलीच्या तक्रारीवरून दोघांविरुद्ध अत्याचार व बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये तर, ज्या व्यक्तींनी, नातेवाइकांनी अल्पवयीन मुलीचे दोनवेळा लग्न लावून दिले त्या दोन्ही गटातील सहा जणांविरुद्ध बालविवाह प्रतिबंधक कायद्यान्वये दर्यापुर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहे.

> पिडीतेची तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई केली. पिडीतेचा पहिला पती आणि सासरे या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे.
> – सुनील वानखडे, ठाणेदार, दर्यापूर.

# हत्या करून टाकीत फेकला मृतदेह

## शव विच्छेदन अहवालानंतर रहस्य उलगडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

पठाणचौक येथील एका बंद दवाखान्याच्या इमारतीवरील पाण्याच्या कोरड्या टाकीत आढळलेल्या मृतदेहाचे रहस्य उलगडले असून, त्याची हत्या करून मृतदेह येथे आणून फेकल्याचे स्पष्ट होत आहे. पोलिसांनी शवविच्छेदन अहवालानंतर अज्ञात व्यक्तीविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. पठाणचौक येथील वजीर पटेल यांच्या सामाजिक संस्थेद्वारे चालविण्यात येणारा दवाखाना गत बारा वर्षापासून बंद आहे. त्या दवाखान्यात छतावर दोन प्लॅस्टिकच्या पाण्याच्या जुन्या टाक्या होत्या. त्यापैकी एका टाकीत बुधवारी (ता. १३) दुपारी साडेबाराच्या सुमारास अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयोगटातील एका इसमाचा कुजलेला व उन्हामुळे जळालेल्या अवस्थेतील मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली




होती. गुरुवारी (ता. १४) जिल्हा सामान्य रुग्णालयातील शवागारात शवविच्छेदनाची प्रक्रिया पार पडली. डॉक्टरांनी प्राथमिक शवविच्छेदन अहवाल पोलिसांना दिला. त्यात मृत्यू संशयास्पद असून, मानवी हस्तक्षेपामुळे झाल्याचे स्पष्ट केले आहे. कुणीतरी त्या व्यक्तीला ठार मारुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह बंद दवाखान्याच्या छतावरील कोरड्या टाकीत फेकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्या आधारे अज्ञात व्यक्तीविरुद्ध हत्येचा गुन्हा नागपुरीगेट पोलिसांनी दाखल करून तपास सुरू केला आहे.ओळख न पटल्याने पेच कायम मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटली नसल्यामुळे सदर वयाचा व वर्णनाची कुणी व्यक्ती हरविलेले आहे काय?

> मृत व्यक्तीच्या छाती आणि डोक्याला अंतर्गत मारहाण केल्याच्या जखमा असल्याचे प्राथमिक शवविच्छेदन अहवालात नमुद आहे. पोलिसांना अंतिम शवविच्छेदन अहवालाची प्रतिक्षा आहे.
> **– हनमंत उरलागोंडावर,** पोलिस निरीक्षक, नागपुरीगेट.

याबाबतची माहिती शहर व जिल्ह्यातील इतर पोलिस ठाण्याला पाठविण्यात आली असून, अद्यापही मृत व्यक्तीची ओळख पटलेली नसल्याने पेच कायम आहे. हत्येचे कारण व संशयित हल्लेखोरांची नावे समजू शकलेले नाही.

# विद्यार्थ्यांचे 'आधार' कार्ड अपडेट ठेवा, नाहीतर शाळा बदलता येणार नाही! शिक्षण विभागाचे नवे अटी व शर्ती काय?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

राज्यात विविध माध्यमाच्या जवळपास १ लाखावर शाळा चालविल्या जातात.काही शाळांच्या स्वत:च्या इमारती आहेत तर काही किरायाने इमारत घेत चालविल्या जातात. पण काळानुरूप परिस्थिती बदलली की इमारतीचा पण विचार केल्या जात असतो. त्यात बदल करावा लागतो. ही स्थिती लक्षात घेऊन शासनाने यासंदर्भात नवे धोरण जाहीर केले आहे. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या स्थलांतराबाबत राज्य शासनाने एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. बदलत्या गरजा, वाढते शहरीकरण आणि जागांच्या उपलब्धतेची टंचाई लक्षात घेऊन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शाळांच्या स्थलांतर धोरणात महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. या संदर्भातील सविस्तर शासन निर्णय १५ मे २०२६ रोजी जारी करण्यात आला आहे.केवळ अपवादात्मक परिस्थितीतच परवानगी मिळणार. नव्या धोरणानुसार, राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या आणि सर्व माध्यमांच्या शाळांना केवळ अपवादात्मक परिस्थिती किंवा भौतिक सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठीच स्थलांतराची परवानगी दिली जाईल. यामध्ये प्रामुख्याने खालील कारणांचा समावेश असेल

**असे निकष–** शाळेची इमारत धोकादायक किंवा जीर्ण झाली असल्यास.नैसर्गिक आपत्ती किंवा विकास प्रकल्पामुळे अनिवार्य



स्थलांतर करावे लागत असल्यास.

अपुऱ्या सुविधा असलेल्या इमारतीमधून संस्थेच्या स्वत:च्या किंवा स्वयंपूर्ण इमारतीत जाणे आवश्यक असल्यास.

वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे सुविधा अपुऱ्या पडत असल्यास.

जागामालका कडून भाडेकरार संपुष्टात आला असल्यास.

विद्यार्थी संख्येचे आणि अंतराचे नियम कडक करण्यात आले आहे. शासनाने शाळांच्या पटसंख्येबाबत कडक अट घातली असून, २० पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या प्राथमिक शाळा आणि ४० पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या माध्यमिक शाळांच्या स्थलांतराचा विचार केला जाणार नाही.

तसेच, मूळ जागेपासून शाळा किती अंतरावर स्थलांतरित करता येईल, याच्या मर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत:

प्राथमिक शाळा (इ. १ ली ते ८ वी)- कमाल ५ किलोमीटर.

माध्यमिक शाळा (इ. ९ वी ते १० वी)- कमाल १० किलोमीटर.

उच्च माध्यमिक शाळा (इ. ११ वी ते १२ वी) - कमाल २० किलोमीटर.

**तात्पुरते स्थलांतर–** जर मूळ इमारतीच्या दुरुस्तीसाठी तात्पुरते स्थलांतर करायचे असेल, तर ते कमाल २ वर्षांच्या कालावधीसाठी आणि मूळ जागेपासून ३ किलोमीटरच्या आतच असावे. याचे अधिकार विभागीय उपसंचालकांना असतील. शिक्षकांचे समायोजन आणि आधार प्रमाणीकरण राहणार बंधनकारक. नवीन ठिकाणी स्थलांतर करण्यापूर्वी युडायस (णऊखडए) रिपोर्टनुसार विद्यार्थ्यांचे १००% आधार प्रमाणीकरण असणे अनिवार्य आहे. तसेच, चालू संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन पूर्ण करूनच प्रस्ताव शासनाकडे पाठवावा लागेल. स्थलांतरित ठिकाणी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सामावून घेणे संस्थेला बंधनकारक राहील.

# समृद्धी महामार्गावर वेगावर आता 'सीसीटीव्ही'ची नजर

## नियम मोडणाऱ्यांवर होणार कडक कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती :** अमरावती जिल्ह्यातून जाणाऱ्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर वाढत्या वेगामुळे होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. महामार्गावर विविध ठिकाणी अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, वाहनांच्या वेगावर आता सतत लक्ष ठेवले जाणार आहे.महामार्गावर वाहनांसाठी किमान १०० तर कमाल १२० किलोमीटर प्रतितास वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. मात्र अनेक वाहने निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त वेगाने धावत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. विशेषतः रात्रीच्या वेळी काही वाहनचालकांकडून बेदरकार वेगाने वाहन चालविले जात असल्याने गंभीर अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत होती.याच पार्श्वभूमीवर महामार्ग प्रशासन, वाहतूक विभाग आणि संबंधित यंत्रणांनी संयुक्तपणे वेगनियंत्रण मोहिम हाती घेतली आहे. बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे वाहनांचा वेग, क्रमांक आणि हालचालींची नोंद ठेवणार आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांची माहिती थेट नियंत्रण कक्षाकडे पाठविली जाणार असून, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.प्रशासनाच्या या निर्णयामुळे महामार्गावरील शिस्त वाढण्यास मदत होणार असल्याचे सांगितले जात आहे. वाहनचालकांनी वेगमर्यादेचे पालन करून सुरक्षित प्रवास करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. समृद्धी महामार्ग हा राज्यातील महत्त्वाचा द्रुतगती मार्ग असल्याने सुरक्षितता राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्ता योजनेचा शुभारंभ

## शेतकऱ्यांच्या विकासाला मिळणार चालना – बावनकुळे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती** जिल्ह्यात मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्ता योजनेचा शुभारंभ महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आला. खारतळेगाव येथे आयोजित कार्यक्रमात बावनकुळे यांनी पांदण रस्त्यांची पाहणी करून स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी आमदार राजेश वानखडे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.राज्यात आजपासून मुख्यमंत्री बळीराजा पानंद रस्ता योजना कार्यान्वित होत असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली. शेतकऱ्यांना चांगले रस्ते, २४ तास पाणी आणि वीज उपलब्ध झाली तर त्यांच्या मुलांना सरकारी नोकरीसाठी भटकंती करावी लागणार नाही, असे ते म्हणाले. ग्रामीण भागातील शेती आणि बाजारपेठ यांना जोडणारे पांदण रस्ते मजबूत झाल्यास रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.यावेळी बावनकुळे यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत विविध समस्यांवर संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. या योजनेमुळे शेतीमाल वाहतुकीला गती मिळून ग्रामीण विकासाला हातभार लागणार असल्याची भावना स्थानिक शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

# बडनेरा विकासकामांना गती

# आ. रवि राणा यांचा पाहणी दौरा

**५४ कोटींच्या रेल्वे उड्डाणपुलासह ३०० कोटींच्या रिंगरोड प्रकल्पाचा आढावा**

**अलमास नगरमध्ये कमर्शिअल मार्केट उभारणार**





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती :** बडनेरा शहरातील विविध विकासकामांना गती देण्यासाठी आमदार रवी राणा यांनी प्रमुख प्रकल्पांची पाहणी करत प्रशासनाला कामे जलद पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. माजी खासदार नवनीत यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या अनेक महत्त्वाच्या कामांचा यावेळी आढावा घेण्यात आला.पाहणी दौऱ्याची सुरुवात जुनिवस्ती जुना बायपास परिसरातील ५४ कोटी रुपयांच्या रेल्वे उड्डाणपुल व अंडरपास प्रकल्पापासून करण्यात आली. अनेक वर्षांपासून रेल्वे फाटकामुळे वाहतूक कोंडीचा सामना करणाऱ्या नागरिकांना या प्रकल्पामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

पुलाचे काम पूर्णत्वास आले असून लवकरच हा मार्ग जनतेसाठी खुला करण्यात येणार असल्याची माहिती आ. रवि राणा यांनी दिली.त्यानंतर चमन नगर ते नवसारीदरम्यान सुरू असलेल्या सुमारे ३०० कोटी रुपयांच्या रिंगरोड प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. या रिंगरोडमुळे शहरातील वाढती वाहतूक बाहेर वळविण्यास मदत होणार असून अंतर्गत रस्त्यांवरील ताण कमी होणार आहे. यामुळे बडनेरा शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.अलमास नगर येथील अंडरपासची पाहणी करताना गेट परिसरात अत्याधुनिक कमर्शिअल मार्केट उभारण्याचा निर्णयही जाहीर करण्यात आला. या मार्केटमध्ये लघु व गरीब व्यावसायिकांना प्राधान्याने दुकाने उपलब्ध करून देण्यात येणार असून परिसराचे सौंदर्यीकरणही करण्यात येणार आहे.

शहरातील वाढत्या अतिक्रमणाबाबतही आ. रवि राणा यांनी प्रशासनाला कठोर कारवाईचे निर्देश दिले. ज्या ठिकाणी अतिक्रमण आढळेल ते हटविले जाईल. नागरिकांनी वाहतुकीस अडथळा निर्माण करू नये व शहर स्वच्छ-सुंदर ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.या दौऱ्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, रेल्वे अधिकारी, मनपा पदाधिकारी, नगरसेवक तसेच विविध विभागांचे अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आयुक्त वर्षा लड्डा यांच्या निवासस्थानापासून मनपा अमरावतीच्या प्रत्यक्ष घरगणनेचा शुभारंभ




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती** महानगर पालिकेच्या घरगणना अभियानाचा शुभारंभ आज दिनांक १६ मे २०२६ रोजी सकाळी ०८ वाजता मा. श्रीमती वर्षा लड्डा, आयुक्त, मनपा अमरावती यांच्या निवासस्थानास घरगणना क्रमांक प्रदान करून प्रत्यक्ष घरगणना कार्यास सुरुवात करण्यात आली.यावेळी मा. श्रीमती वर्षा लड्डा, आयुक्त, मनपा अमरावती, मा. श्री योगेश पीठे, उपायुक्त (१), मनपा अमरावती, मा. श्री नंदकिशोर तिखीले, चार्ज अधिकारी झोन क्र. १, मा. श्री अक्षय निलंगे, सहाय्यक शहर जनगणना अधिकारी, श्री कैलास कुलट, श्री प्रफुल अनिलकर, श्री डेसमेंट फर्नांडिस प्रगणक तसेच श्रीमती राजकन्या डाबेराव पर्यवेक्षक उपस्थित होते.यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी घरगणना ही अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय प्रक्रिया असून नागरिकांनी प्रशासनाला योग्य माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले. तसेच घरगणना कार्य अचूक, पारदर्शक व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या.

# नगररचना विभाग व मनपाच्या 'नियोजनशून्य' कारभाराचा बळी

## अर्जुन नगरातील भीषण अपघातात दुचाकीस्वाराने गमावला जीव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

शहरातील अर्जुन नगर परिसरात प्रशासकीय अनास्था आणि नगररचना विभागाच्या अत्यंत चुकीच्या व बेजबाबदार नियोजनाचा एक अत्यंत दुर्दैवी आणि भीषण परिणाम समोर आला आहे. अरुंद रस्ता आणि वाढत्या वाहतुकीमुळे झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या ४५ वर्षीय सुनील देशमुख यांचे उपचारादरम्यान निधन झाले आहे. या घटनेमुळे संपूर्ण अर्जुन नगर परिसरातील रहिवाशांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, हा अपघात नसून मनपा व नगररचना प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे लागलेला 'बळी' असल्याचा थेट आरोप नागरिक करत आहेत.शिवाजी शिक्षण संस्थेत कार्यरत असलेले



सुनील देशमुख नेहमीप्रमाणे कार्यालयातून घरी परतत असताना, अर्जुन नगरातील हनुमान मंदिर परिसरात एका भरधाव टिप्परने त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. रस्ता अत्यंत अरुंद असल्याने दुचाकीला सावरण्यास कोणतीही जागा उरली नाही. या भीषण धडकेत देशमुख टिप्परच्या चाकाखाली आले आणि त्यांचे दोन्ही पाय पूर्णपणे चेंदामेंदा झाले होते. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, परंतु जखमा अत्यंत गंभीर असल्याने अखेर त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या या अकाली निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### महानगरपालिका व नगररचना विभागाचा 'डोळेझाकपणा'?

अर्जुन नगर परिसरात आजमितीस २०,००० हून अधिक लोकसंख्या आहे. नियमानुसार इतक्या मोठ्या लोकवस्तीसाठी प्रशस्त आणि रुंद रस्त्यांची गरज असताना, नगररचना विभागाने आणि अमरावती मनपाने केवळ २० फुटांच्या रस्त्यावर या संपूर्ण लोकसंख्येला वाऱ्यावर सोडले आहे. या परिसरात मोठे निवासी प्रकल्प मंजूर करताना जुन्या वहिवाटीच्या रस्त्यांचा बळी देण्यात आला आहे. जुन्या नकाशांमधील रस्ते नवीन ले-आउट्स मंजूर करताना जाणीवपूर्वक गायब करण्यात आले असून, सहायक संचालक नगररचना विभाग तसेच मनपाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी न करताच या नकाशांना मंजुरी कशी दिली? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

पर्यायी मार्ग असता तर टळला असता अनर्थस्थानिक नागरिकांच्या मते, अर्जुन नगरातील पाण्याच्या टाकीजवळून एसएसडी बंगलो परिसराकडे जाणारा पर्यायी रस्ता नकाशात उपलब्ध असूनही तो प्रत्यक्ष जागेवर नागरिकांसाठी खुला करून देण्यात आलेला नाही. मनपा प्रशासनाने जर हा मार्ग सुरू केला असता, तर मुख्य रस्त्यावरील ५० टक्के वाहतूक विभागली गेली असती आणि आज सुनील देशमुख यांना आपला जीव गमवावा लागला नसता. टाऊन प्लॅनिंग विभाग आणि मनपाच्या नगररचना विभागाने सामान्य नागरिकांची कनेक्टिव्हिटी तोडून त्यांना मृत्यूच्या सापळ्यात ढकलल्याचा आरोप रहिवासी करत आहेत.

■ नागरिकांच्या प्रमुख मागण्याअर्जुन नगर परिसरातील ले-आउट्सच्या नकाशांची तातडीने पुनर्तपासणी करून नकाशातून गायब केलेले रस्ते तात्काळ मोकळे करण्यात यावेत.* २०,००० नागरिकांच्या भविष्यातील सुरक्षिततेसाठी मुख्य रस्त्याचे तातडीने युद्धपातळीवर रुंदीकरण करावे.* कर्तव्यात कसूर करणाऱ्या, प्रत्यक्ष जागेची पाहणी न करता चुकीच्या पद्धतीचे नकाशे मंजूर करून निष्पाप नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या नगररचना विभागाच्या व मनपाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची व फौजदारी कारवाई व्हावी.

### प्रशासन आता आणखी किती बळी जाण्याची वाट पाहत आहे का?

असा संतप्त सवाल विचारत, जर येत्या काही दिवसांत महानगरपालिका आणि नगररचना विभागाने यावर ठोस व सकारात्मक कारवाई केली नाही, तर मृत सुनील देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा अर्जुन नगर परिसरातील समस्त बाधित नागरिकांनी दिला आहे.-

# समृद्धी महामार्गावर संशयित तेलुगू युवक ताब्यात; २.२४ लाखांचा मुद्देमाल जप्त

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१६ मंगरुळ दस्तगीर :** समृद्धी महामार्गावर संशयास्पद हालचाली करणाऱ्या दुचाकीस्वाराचा पाठलाग करून पोलिसांनी एका तेलुगू युवकाला ताब्यात घेत मोठी कारवाई केली. या कारवाईत तब्बल २ लाख २४ हजार ५६२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्यामध्ये रोख रक्कम, मोबाईल, बनावट नंबर प्लेट, लोखंडी हत्यारे व दुचाकीचा समावेश आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आयसी-६ नवीन धामणगाव समृद्धी महामार्गावर पोलीस पथक ड्युटीवर असताना टोल मॅनेजर सुरेंद्र बनकर यांनी मोबाईलद्वारे माहिती दिली की, एक दुचाकीवर दोन इसम भरधाव वेगाने नागपूर कॉरिडॉरच्या दिशेने पळून गेले आहेत.यानंतर पोलिसांनी तत्काळ पाठलाग सुरू केला. नागपूर कॉरिडॉरवरील चॅनल क्रमांक ९१ जवळ वर्धा नदी पुलाजवळ संशयित दुचाकी अडविण्यात आली. मात्र मागे बसलेला इसम घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाला. चालकही पसार होण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी त्याला पकडले.ताब्यात घेतलेल्या युवकाने आपले नाव इमानेल मेकला (वय २७ वर्षे, रा. पिटरागोंडा, जि. नेल्लोर, आंध्रप्रदेश) असे सांगितले. पोलिसांनी त्याची व बॅगेची झडती घेतली असता खालील मुद्देमाल आढळून आला



:रोख रक्कम - १,५४,५६२ विविध वाहनांच्या ८ नंबर प्लेट (एकूण १६ प्लेट)मोबाईल - ३ नग लोखंडी हत्यारे - ३ नगगुलेल - २ नग आधार कार्ड - ३रेल्वे तिकिटेकाळ्या रंगाची होंडा युनिकॉर्न दुचाकी (चक १२ छट ५८४७) किंमत अंदाजे ७०,०००असा एकूण २,२४,५६२ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.तसेच त्याच्यासोबत पळून गेलेल्या दुसऱ्या इसमाबाबतही तो उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यामुळे हा मुद्देमाल चोरीचा असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. ही कारवाई प्रभारी अधिकारी पो.उपनिरीक्षक जमनादास सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली पो. उपनिरीक्षक सुधीर गावंडे, पोहेकॉ. नरेंद्र मेश्राम, पोहेकॉ. मनोज ढेरे, पोहेकॉ. शैलेश वानखडे, एमएसएफ जवान सुनील राठोड, स्नेहल तायडे व कुणाल सूर्यवंशी यांनी केली.सदर प्रकरणी पुढील तपास मंगरुळ दस्तगीर पोलीस करीत आहेत.


